| MHGA070003352017 |
|---|

| | |
|---|---|
| प्राप्त तारीख | ०८.०६.२०१७ |
| नोंदणी तारीख | ०८.०६.२०१७ |
| निकाल तारीख | २९.०४.२०२६ |
| कालावधी | **०८ वर्ष, १० महिने, २१ दिवस** |

**भाग अ***

**(न्यायनिर्णयाचे शीर्षक पृष्ठ)**

**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (१)]**

| | |
|---|---|
| | **निशाणी –७७** |
| **अहेरी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, अहेरी, यांच्या न्यायालयात,<br>पिठासिन अधिकारी : एस.एम.एच.शाहिद,** | |
| पहिल्या खबरीचा तपशील | अपराध क्र. <u>**६१/२०१६**</u><br>पोलीस स्टेशन, अहेरी |
| न्यायनिर्णयाची तारीख | **२९.०४.२०२६** |
| प्रकरण क्रमांक | **नियमित फौजदारी खटला क्रमांक २३/२०१७** |
| तक्रारकर्ता / अभियोग पक्ष | **महाराष्ट्र शासन तर्फे<br>पोलीस स्टेशन अहेरी,** |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | **श्री. आर.एस. उंदिरवाडे,**<br>(सुविद्य सहाय्यक सरकारी अभियोक्ता) |
| आरोपी | **राजु नारायन कोंडागुर्ले,**<br>वय २८ वर्षे, व्यवसाय – शेती,<br>राहणार  चेरपल्ली, ता. अहेरी,<br>जिल्हा गडचिरोली. |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | **श्री. गलबले**<br>(बचाव पक्षातर्फे सुविद्य विधीज्ञ) |

**भाग ब***

* दि. १४.०७.२०२२ रोजी प्रकाशित राजपत्र क्र. ०८०१/२०२२ नुसारच्या नमुन्यात.

[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (२)]

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | २१.०८.२०१६ |
| पहिल्या खबरीची तारीख | २१.०८.२०१६ |
| अंतिम अहवाल दाखल तारीख | ०८.०६.२०१७ |
| दोषारोपनिश्चितीची तारीख | ०८.०६.२०१७ |
| पुराव्याला सुरुवात झाल्याची तारीख | १६.०१.२०१८ |
| न्यायनिर्णयासाठी नेमल्याची तारीख | २९.०४.२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख, | २९.०४.२०२६ |
| शिक्षा झाली असल्यास ती तारीख | – |

**आरोपीबाबत तपशील**

| आ. क्र. | आरोपीचे नांव | अटक तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | संपरिक्षीत गुन्हे | दोषसिद्ध की निर्दोष मुक्त | दिलेली शिक्षा | फौ.प्र.संहिता कलम ४२८ नुसार अभिरक्षेत घालविलेला कालावधी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | राजु नारायण कोंडागुर्ले | ३०.०६.२०१९ | ०८.०६.२०१७ | भा. दं. वि. चे कलम ३२६ व ५०४ अन्वये | निर्दोष | – | – |

| या न्यायनिर्णयात वापरलेल्या संक्षेपार्थी शब्दांचा तपशील | |
|---|---|
| फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ | **फौजदारी संहिता** |
| भारतीय दंड विधान, १८६० | **दंड विधान** |
| भारतीय पुरावा अधिनियम, १८७२ | **पुरावा अधिनियम** |

## भाग क

## [फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (३)]

## अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने बोलविलेल्या साक्षीदारांची यादी

अ. अभियोग पक्ष:

| क्रमांक | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| सा.क्र. १ | विठ्ठल मलय्या जुनतकर (**निशाणी २० खाली**) | फिर्यादी |
| सा.क्र. २ | मनोहर जोगा झाडे (**निशाणी २२ खाली**) | घटनास्थळ पंच |
| सा.क्र. ३ | भानुचंद्र शंकर सुनतकर (**निशाणी २३ खाली**) | साक्षीदार |
| सा.क्र. ४ | मनोज यादव कुनघाडकर (**निशाणी २७ खाली**) | साक्षीदार |
| सा.क्र. ५ | अरूण विठ्ठल सुनतकर (**निशाणी २८ खाली**) | साक्षीदार |
| सा.क्र. ६ | सुनिल विठ्ठल सुनतकर (**निशाणी २९ खाली**) | साक्षीदार |
| सा.क्र. ७ | डॉ. संजय रमेश उमाटे (**निशाणी ३६ खाली**) | वैद्यकिय अधिकारी |
| सा.क्र. ८ | गिता अंबादास आत्राम (**निशाणी ४२ खाली**) | साक्षीदार |
| सा.क्र. ९ | चांगदेव नामदेव कोळेकर (**निशाणी ५५ खाली**) | तपासी अंमलदार |
| सा.क्र.१० | सुरज राजरेडडी गददेवार (**निशाणी ६५ खाली**) | सि.ए माल दाखल करणारे |
| सा.क्र.११ | भाग्यश्री महेंद्र कांबळे (**निशाणी ६९ खाली**) | साक्षीदार |

## अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने दिलेल्या निशाणीबद्ध दस्तांची यादी

अ. अभियोग पक्ष:

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निशाणी **पी–३७/सा.क्र.७** | प्रमाणपत्र |
| २. | निशाणी **पी–५६/सा.क्र.९** | घटनास्थळ पंचनामा |
| ३. | निशाणी **पी–५७/सा.क्र.९** | निवेदन पंचनामा |
| ४. | निशाणी **पी–५८/सा.क्र.९** | माल काढून देण्याचा पंचनामा |
| ५. | निशाणी **पी–५९/सा.क्र.९** | जप्तीपत्रक |
| ६. | निशाणी **पी–६०/सा.क्र.९** | गुन्हयातील तपशील नमुना |

| | | |
|---|---|---|
| ७. | निशाणी **पी–६१/सा.क्र.९** | दि.०२.०९.२०१६ रोजीचे पत्र |
| ८. | निशाणी **पी–६२/सा.क्र.९** | दि.१२.०२.२०१७ रोजीचे पत्र |
| ९. | निशाणी **पी–६३/सा.क्र.९** | दि.१२.१२.२०१७ रोजीचे पत्र |
| १०. | निशाणी **पी–६४/सा.क्र.९** | दि.२८.०८.२०१७ रोजीचे पत्र |

**ड. महत्त्वाच्या वस्तु:**

| **अ.क्र.** | **महत्त्वाची वस्तु क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | वस्तु क्र.१ | काठी |
| २. | वस्तु क्र.२ | जप्त शर्ट |

## न्यायनिर्णय

[आज दिनांक २९ एप्रिल, २०२६ रोजी उद्घोषित]

आरोपीविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ३२६ व ५०४ प्रमाणे खटला चालवण्यात आला.

२. अभियोगपक्षाची थोडक्यात हकीकत अशी आहे की, आज दिनांक २१/०८/२०१६ रोजी ते सकाळी ०८.०० वा. त्यांच्या शेतातील बोडीतुन इंजिनद्वारे पाणी काढून धानाच्या शेताला देत असताना त्यांचा भाचा आरोपी नामे राजू नारायण कोंडागुले याने त्यांच्या शेतात येवून तु बोडीतील पाणी तुझया शेतात देवू नको, त्यावर तुझा हक्क नाही, असे म्हणून इंजिन बंद केले. त्यानंतर त्यांनी आरोपीला तु इंजिन का बंद देले असे विचारणा केली व त्यांनी स्वताः त्यांचे इंजिन सुरु केले. तेव्हा आरोपीने त्यांना शिवीगाळ करुन धक्काबुक्की करुन त्याच्या हातात असलेल्या लाकडी दांडयाने फिर्यादीच्या डोक्यावर तसेच डावे हाताच्या दंडावर मारहाण करुन जखमी केले व तिथुन त्याचे शेतात निघुन गेला. ते जखमी अवस्थेत जवळच असलेल्या पुसुकपल्लीकडे जाणाऱ्या डांबरी रस्त्यावर आले. तिथे आल्यानंतर काही वेळात त्यांच्या गावातील शेजारी राहणारा आरोपी राजु नारायण चौधरी हा मोटारसायकलने चेरपल्लीवरुन ते पुसुकपल्लीकडे

जात होता. त्याला जखमी अवस्थेत पाहुन त्याने त्याची मोटारसायकल थांबविली व विचारपुस केली तेव्हा त्याला सर्व हकीकत सांगितली व त्यानंतर त्यांनी त्यांना त्यांच्या मोटारसायकलवर बसवुन त्यांचे घरी सोडले त्यानंतर त्यांनी सर्व हकीकत त्यांची पत्नी नामे पुष्पा विठ्ठल सुनतकर हिला सांगितली त्यानंतर त्यांची पत्नी व ते पोलीस स्टेशन अहेरी येथे येवुन आरोपीविरुध्द तोंडी फिर्याद दिली.

३. पोलीस ठाणे अंमलदाराने सदर तक्रारीवरुन अपराध क्र.६१/२०१६ उपरोक्त कलमान्वये आरोपीविरुध्द गुन्हा दाखल केला. सदर गुन्हयाचा तपास सहा.पोलीस निरीक्षक चांगदेव नामदेव कोळेकर यांच्याकडे सोपवण्यात आला. त्यांनी पंचांसमक्ष घटनास्थळाचा पंचनामा तयार केला. घटना स्थळावर जावुन पंचनामा पंचांसमक्ष तयार केला. त्यानंतर त्याने फिर्यादी व साक्षीदारांचे जबाब नोंदवले. आरोपीला अटक करुन तसा अटक पंचनामा तयार केला. रुग्णालयातून फिर्यादीचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले. पुरावा गोळा करुन त्यांनी सविस्तर अहवाल तयार करुन तपासाअंती आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. माझे पूर्व पिठासीन अधिकारी यांनी दि.०८.०६.२०१८ रोजी आरोपीविरुध्द नि.क्र.१६ वर दोषरोप निश्चित केले. त्यातील मजकूर आरोपीला वाचून व समजावून सांगितला. त्यांनी गुन्हा कबूल न करता न्याय चौकशी सामोरे जाणे पसंत केले. त्याच्याविरुध्द पुरावा नसल्याने त्याचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) अन्वये नोंदवण्यात आले नाही.

५. आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द होण्याकरिता खालील मुद्दे उपस्थित होतात. त्याकरिताचे माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो का की, दि. २१.०८.२०१८ रोजी, सुमारे ०८.०० ते ०८.३० वाजता, चेरपल्ली शेताजवळ आरोपीने फिर्यादी /जखमी विठठल मलय्या सुनतकर याला लाकडी काठीने डोक्यावर, खांदयावर मारून स्वेच्छेने गंभीर दुखापत | |

| | | |
|---|---|---|
| | केली. ती काठी गुन्यात शस्त्र म्हणुन वापरली जाते. ज्यामुळे मृत्यु होण्याची शक्यता आहे व त्याद्वारे भा.दं.वि.चे कलम ३२६ प्रमाणे शिक्षेस पात्र गुन्हा केला ? | ... नाही. |
| २. | त्याचप्रमाणे वरिल दिनांक, वेळ व ठिकाणी तुम्ही आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ केली आणि अशा प्रक्षोभनामुळे त्याच्याकडुन सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा अन्य कोणताही अपराध घडावा किंवा तसे होण्याचा संभव असल्याची तुम्हाला जाणीव होती व त्याद्वारे भा.दं.वि. कलम ५०४ प्रमाणे शिक्षेस पात्र गुन्हा केला ? | ... नाही. |
| ३. | आदेश काय ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यांत आली. |

## कारणमिमांसा

६. अभियोगपक्षाने आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द करणेकामी अकरा साक्षीदारांची साक्ष नोंदवली.

**मुद्दा क्र.१ व २ करिताः**

७. सदर मुद्दे एकमेकाशी निगडीत असल्याने ते मी एकत्रीतरित्या निर्धारणासाठी घेतले आहे. २१/०८/२०१६ रोजी ते सकाळी ०८.०० वाजताच्या दरम्यान फिर्यादी नामे विठठल मलय्या सुनतकर याला लाकडी काठीने डोक्यावर, खांदयावर मारून स्वेच्छेने गंभीर दुखापत पोचविली व फिर्यादीला जिवे मारण्याची धमकी दिली, दुखापत पोहचविल्याचे अभियोगपक्षाने सिध्द करणे आवश्यक आहे.

८. फिर्यादी साक्षीदार सा.क्र.१ विठठल मलय्या सुनतकर यांचे सरतपासात असे कथन केले की, तो आरोपीला ओळखतो. घटना अंदाजे दोन वर्षापुर्वी ते धानास पाणी देत असतांना त्यांची व आरोपीची मारापीटी झाली. सदर वेळी मारहाणीमुळे त्यांचे डोके फुटले होते. पोालीसांनी त्यांना

दवाखान्यात नेले होते. त्यांना घटनेबाबत रिपोर्ट दिला होता. त्यांना फिर्याद दाखविली परंतु मजकुर माहित नसल्याचे सांगीतले. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी मान्य केले की, घटनेवेळी ते पाणी देत असलेली शेती त्यांच्या परंपरागत वारसा हक्काची शेती आहे. आरोपीची आई त्याची सख्खी बहिण आहे. घटनेवेळी फिर्यादी व आरोपीची शेती धान रोवणीकरिता आली होती. त्यावेळी दोघांनाही त्याच्या शेतीला पाण्याची आवश्यकता होती. फिर्यादी व आरोपी हे त्याच्या शेतीला मिळून पाणी सोडण्याकरिता एकच बोडी आहे. त्यांनी उलटतपासात अमान्य केले की, आरोपीचे धान रोवणीकरिता पाणी राहणार नाही त्यामुळे तो बोलल्यामुळे त्यांच्यामध्ये दोन दोन गोष्टी झाल्या होत्या. त्यांनी उलटतपासात मान्य केले की, त्याचे इतर भाउ बहिणीसोबत पटत नाही. त्यांनी अमान्य केले की, जमीनीच्या हिश्याच्या वादामुळे त्याचे इतर भाउ बहिणींशी पटत नाही. उलटतपासात असेही मान्य केले की, त्याचे आरोपीच्या आईसोबत लहानपणापासुन वाद आहे. त्याचे इतर बहिण भाउ आरोपीसोबत राहतात. त्यांनी अमान्य केले की, गावातील प्रतिष्ठीत लोकांनी ते आरोपीसोबत वादविवाद न करता व्यवस्थीत रहाण्याचा सल्ला दिला होता. त्यांनी असेही मानय केले की, त्याचे इतर भाउ नोकरीवर असून बहिणी दुस–या गावात राहतात. त्याचे भाउ बहिणीमध्ये आरोपी एकटाच व्यवसायाने शेतकरी आहे. त्याचे व आरोपीचे शेत लागुन असल्यामुळे त्याच्यामध्ये ब–याच वर्षापासुन वाद आहे. त्यांनी अमान्य केले की, घटनेच्या दिवशी बोर्डातुन पाय घसरून पडल्यामुळे त्याला मार लागला होता. ते व आरोपीमध्ये शेतीच्या कारणावरून वाद असल्यामुळे त्याने काठीने मारहाण केल्याचे खोटे सांगीतले. त्यांनी इतर सुचक प्रश्नांना नकारार्थी उत्तरे दिली.

९. साक्षीदार सा.क्र.२ **मनोहर जोगा झाडे** यांचे सरतपासात असे आले आहे की, त्यांना दि.२३.०८.२०१६ रोजी निवेदन पंचनाम्यावरिल मजकुर नाकारला. साक्षीदार अभियोग पक्षाला समर्थन करित नसल्यामुळे सरकारी वकीलांनी त्याला उत्तर सुचक प्रश्न विचारले असता त्यांनी मान्य केले की, दिनांक २३.०८.२०१६ रोजी पोलिसांनी त्यांना अहेरी पोलीस ठाण्यात बोलावले होते. त्यावेळी आरोपी कोठडीत होता आणि त्याने त्याचे नाव राजू कोंडागुर्ला असे सांगितले. विठ्ठल सुनटकर यांना मारहाण करण्यासाठी वापरलेली, त्याने लपवून ठेवलेली काठी पोलिसांना दिल्याचा कबुली जबाब आरोपीने दिला होता की नाही, हे त्यांना आठवत नाही असे सांगीतले. उलटतपासात त्यांनी अमान्य केले की, त्यानंतर ते, पोलीस कर्मचारी आणि आरोपी खाजगी वाहनाने आरोपीच्या

शेतात गेले. त्यानंतर आरोपीने बाभळीच्या झाडाखाली ठेवलेली लाकडी काठी बाहेर काढली. त्यानुसार पोलिसांनी त्याच्या उपस्थितीत त्याच ठिकाणी मेमोरंडम पंचनामा तयार केला. पोलिसांनी सदर पंचनाम्यातील मजकूर वाचून दाखवला आणि त्यानंतर त्यांची सही घेतली. आरोपी त्यांच्या गावचा रहिवासी आहे. दिनांक २१.०८.२०१६ चा जप्तीचा दस्तऐवज त्यांना दाखविला असून त्यावर सही असून त्यातील मजकूर माहीत नसल्याचे सांगीतले. त्यांनी अमान्य केले की, दिनांक २१.०८.२०१६ रोजी पोलिसांनी अहेरी पोलीस ठाण्यात त्यांच्या उपस्थितीत माहिती देणाऱ्याचा रक्ताने माखलेला शर्ट जप्त केला होता. आरोपींच्या वकीलांनी घेतलेल्या उलटतपासात मान्य केले की, फिर्यादी आणि आरोपी यांच्यात जमिनीच्या कारणांवरून अनेक वर्षांपासून वाद आहेत.

१०. साक्षीदार सा.क्र.३ **भानुचंद्र शंकर सुनतकर** हा साक्षीदार असून त्याच्या सरतपासात असे आले आहे की, ते आरोपीला व फिर्यादीला ओळखतात. त्याच्या शेतातुन फिर्यादीचे शेत दिसते. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात पोलिसांनी प्रस्तुत घटनेबाबत त्यांच्याकडे चौकशी केली नव्हती. त्यांनी इतर सर्व सुचक प्रश्नांना नकारार्थी उत्तरे दिली.

११. साक्षीदार सा.क्र.४ **मनोज यादव कुनघाडकर** यांचे सरतपासात असे आले आहे की, दि.२१.०८.२०१६ रोजी पोलीस स्टेशन अहेरी येथे कार्यरत होते. सदर दिवशी त्ायंना पोलीस निरिक्षक री कोळेकर यांनी अपराध क्र.६१/२०१६ मधील आरोपी मुददेमाल काढून देणार असल्याबाबत निवेदन देणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर ते, श्री कोळेकर, दोन पंचसह आरोपी सांगत असलेल्या ठिकाणी शासकीय वाहनाने मौजा चेरपल्ली येथे शेतशिवारामध्ये गेले. तेथून एका झुडपाखालुन आरोपीने लाकडी काठी काढून दिली. श्री कोळेकर यांनी तेथे पंचनामा तयार केला. तपासी अधिकारी यांनी नमुद बाबीसंबंधी त्यांचे बयाण घेतले. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी मान्य केले की, श्री कोळेकर यांनी त्यांना निवेदन पंचनामा करण्याकामी हजर राहण्याकरिता लेखी सुचनापत्र दिले नव्हते. ते अहेरी येथून चेरपल्ली येथे शासकीय वाहनाने गेले. त्यावेळी वाहनामध्ये समोरच्या सिटवर कोण बसले त्यांना आठवत नाही. गाडीमध्ये मागे आरोपी व पंच बसलेले होते. त्यांनी इतर सर्व सुझाव नाकारला.

१२. साक्षीदार सा.क्र.५ **अरूण विठठल सुनतकर** यांचे सरतपासात असे आले आहे की, फिर्यादी विठठल हे त्यांचे वडील आहे. दि.२१.०६.२०१६ रोजी घ् गावातील एका इसमाने फोन करून त्यांचे वडील व आरोपीचे भांडण झाल्याचे त्यांना सांगीतले होते. त्यांचे शेतीच्या बोडीच्या पाण्यावरून भांडण झाले होते. आरोपीने इंजीन बंद केले होते. त्यांच्या वडीलांनी आरोपीस त्याबाबत विचारले असता तुझा इथे काय हक्क आहे. असे म्हणला होता. नंतर आरोपीने लाकडी काठीने त्याच्या वडीलांना डोक्यावर मारहाण केली. त्याची आई वडील पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यासाठी गेले होते. तेथून ते दवाखान्यात गेले. पोलीसांनी सदर घटनेबाबत त्यांच्याकडे चौकशी केली होती.

१३. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी पोलीसांना बयाण देतेवेळी दि.२१.०८.२०१६ रोजी गावातील एका इसमाने फोन करून त्याचे वडील व आरोपीचे भांडण झाले ही बाब सांगीतली होती. दि.२१.०८.२०१६ रोजी ते चंद्रपुर येथे होते. त्यांनी मान्य केले की, त्यांचे वडील व आरोपीची आई व इतर भावडांचा शेतीचे कारणावरून पुर्वीपासुन वाद आहे. त्याचे वडील व आरोपी एकाच बोडीमधुन शेतांना पाणी देतात. कथीत घटनेचेवेळी धानाचे पीकाकरिता पाण्याची आवश्यकता होती. त्याने इतर सर्व सचक प्रश्नांना नकारार्थी उत्तरे दिली.

१४. साक्षीदार सा.क्र.६ **सुनिल विठठल सुनतकर** यांचे सरतपासात असे आले आहे की, फिर्यादी विठठल त्याचे वडील आहे. दि.२१.०८.२०१६ रोजी सकाळी ०८.०० ते ०९.०० वाजता त्यांच्या वडीलांना आरोपीने काठीने मारहाण केल्याबाबत फोनवरून माहिती मिळाली. त्यानंतर ते चंद्रपु येथून अहेरी येथे येण्यासाठी निघाले. ते अहेरी येथे पोहचले तेव्हा त्यांच्या वडीलांनी पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिली. आरोपीने बोडीचे पाणी घेण्याचे कारणावरून त्याच्या वडीलांना मारहाण केली. सदर मारहाणीमध्ये त्यांच्या वडीलांच्या डोक्याला मार लागला होता. पोलीसांनी सदर घटनेबाबत त्यांच्याकडे चौकशी केली होती.

१५. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी मान्य केले की, आरोपी त्याचा सख्खा आत्याचा मुलगा आहे. त्याचे वडील ज्या बोडीतुन देत होते ती त्याची, आरोपी व त्यांच्या आत्याच्या सामाईक मालकीची आहे. ते पोलीसांना बयाण देतेवेळी घटनेच्या दिवशी चंद्रपुर येथे

होता. घटनेची माहिती त्यांना फोनद्वारे मिळाली. माहिती मिळाल्यानंतर ते चंद्रपुर येथून अहेरीला आले. या बाबी सांगीतल्या होत्या. सदर बाबी पोलीसांनी त्याच्या बयाणामध्ये का लिहील्या नाही ये तो सांगु शकत नाही. त्यांनी घटना प्रत्यक्ष पाहिली नाही. त्यांनी हे मानय केले की, त्यांच्यामध्ये, आत्या व काका यांच्यामध्ये जमीनीच्या कारणावरून वाद सुरू आहे. त्यांच्यामध्ये योग्य हिस्सेवाटणी न झाल्याच्या कारणावरून त्यांनी तक्रारी केल्या आहेत. त्यांनी आत्या व काकाच्या विरोधा तक्रारी केल्या आहेत. आत्याच्या हिस्स्याला आलेली जमीन आरोपी कसतो. त्यांचे ब–याचदा जागेच्या कारणावरून वाद झाला आहे. इतर सुचक प्रश्नांना त्यांनी नकारार्थी उत्तरे दिली.

१६. साक्षीदार सा.क्र.७ **डॉ संजय रेमेश उमाटे** यांचे सरतपासात असे आले आहे की, दिनांक २१/०८/२०१६ रोजी ते अहेरी येथील उप–जिल्हा रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत होते. त्या दिवशी सकाळी सुमारे १०.३० वाजता, श्री. गड्डलवार (बी. क्र. ४३०१) नावाचे पोलीस कर्मचारी विठ्ठल मलय्या सुनटकर नावाच्या रुग्णाला वैद्यकीय तपासणीसाठी त्यांच्या रुग्णालयात घेऊन आले होते. उपरोक्त रुग्णाची तपासणी केल्यावर, त्यांना त्यांच्या शरीरावर जखमा आढळून आल्या. टाळूच्या डाव्या बाजूला ४ x १ सेंमी आकाराची फाटलेली जखम झाली होती. सदर जखम ताजी होती. ती एका कठीण आणि बोथट वस्तूमुळे झाली होती. सदर जखम गंभीर स्वरूपाची होती आणि ती बरी होण्यासाठी दहा ते पंधरा दिवसांचा कालावधी लागणार होता. उपरोक्त रुग्णाच्या तपासणीबाबत, त्यांनी वैद्यकीय–कायदेशीर प्रमाणपत्र जारी केले. आता, सदर प्रमाणपत्र त्यांना दाखवण्यात आले आहे. त्यावर त्यांची आणि संबंधित रुग्णाची स्वाक्षरी आहे. सदर प्रमाणपत्रातील मजकूर खरा आणि अचूक आहे. ते प्रदर्शन क्र. ३७ म्हणून चिन्हांकित केले आहे. त्यांनी सदर प्रमाणपत्र पोलीस कर्मचारी श्री. गड्डलवार, बी. क्र. ४३०१, यांच्याकडे सुपूर्द केले. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी इतर सुचक प्रश्नांना त्यांनी नकारार्थी उत्तरे दिली.

१७. साक्षीदार सा.क्र.८ **गीता अंबादास आत्राम** यांचे सरतपासात असे आले आहे की, दि. २१.०८.२०१६ रोजी ते अहेरी पोलीस ठाण्यात कार्यरत होते. त्यादिवशी अपराध क्र. ६१/२०१६ नोंदविला होता त्यातील आरोपी राजु याने हत्यार काढुन देण्याची तयारी दर्शविली म्हणुन त्यांनी पोउपनि कोळेकर आणि इतरांसह चेरपल्ली शेतशिवार येथे गेले. तिथे गेल्यावर आरोपीने झुडपात

लपवुन ठेवलेली काठी काढुन दिली, पोउनि कोळेकर यांनी ती काठी जप्त केली. त्याबाबत त्यांनी पंचनामा वगैरे तयार केला. त्यानंतर ते पोलीस ठाण्यात परतले.होतो. या गुन्ह्याचे तपासी अधिकारी श्री. कोळेकर यांनी त्यांचा जबाब नोंदविला होता.

१८. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी मान्य केले की, चेरपल्ली हे मोठे गांव आहे व त्याचे शेतशिवार देखील खुप मोठे आहे. बाहेरगावी कर्तव्य बजावणीसाठी जातांना त्यांना ठाणे दैनंदिनीत नोंद घ्यावी लागते. ते ज्या शासकीय वाहनाने जातो त्याच्या लॉगबुकमधे नोंद करावी लागते. बाहेरगावी कर्तव्य बजावणी करुन आल्यावर त्यांना आमद अर्थात वापसी रिपोर्ट द्यावा लागतो व तो दोन प्रतीत दिला जातो. याबाबतची आमदची त्यांच्याकडील प्रत त्यांनी तपासी अधिकाऱ्याला दिली नव्हती. त्यांनी इतर सुचक प्रश्नांना त्यांनी नकारार्थी उत्तरे दिली.

१९. साक्षीदार सा.क्र.९ **चांगदेव नामदेव कोळेकर** यांचे सरतपासात असे आले आहे की, दि.२१.०८.२०१६ रोजी पो.स्टे. अहेरी येथे कार्यरत होते. सदर गुन्हयाचा पुढील तपास त्यांना सोपविण्यात आला होता. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळी जावुन दोन पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला होता. घटनास्थळ पंचनामा नि.क्र.५६ दाखविण्यात आला. त्यानंतर आरोपीचा निवेदन नोंदविण्यात आले होते. आरोपीने दिलेले निवेदनाप्रमाणे पुढील कारवाई करण्यात आली होती. आरोपीने निवेदन दिले होते की, लाकडी दांडी काढून देतो. त्यांना निवेदन पंचनामा दाखविण्यात नि.क्र.५७ आला. त्यांनी आरोपीने सांगितल्याप्रमाणे शासकीय वाहनाने घटनास्थळी रवाना झाले. त्यानंतर भांडण झाले त्या बाजुला असलेली झुडपीमधुन आरोपी गुन्हयात वापरलेली काठी काढुन दिली होती. त्यांना माल काढुन देण्याचा पंचनामा नि.क्र.५८ दाखविण्यात आला. त्यांनी फिर्यादीचे एक फुल शर्ट ज्यावर रक्ताचे डाग होते जप्त केले होते. त्यांना जप्तीपत्रक नि.क्र.५९ दाखविण्यात आले. त्यानंतर गुन्हयाचा तपशिल नमुना नि.क्र.६० तयार केला होता. त्यांनी साक्षदारांचे बयान नोंदविले होते. फिर्यादीकडून जप्त केलेला फुल शर्ट व काठी रासायनिक विश्वेशनसाठी न्याय वैज्ञानिक प्रयोगशाळा नागपुर येथे पाठविले होते. त्यांना पत्र दि.०२.०९.२०१६ रोजीचे पत्र नि.क्र.६१ दाखविण्यात आले. रासायनिक अहवाल प्राप्त न झाल्याने दि. १२.०२.२०१७ रोजी न्याय वैज्ञानिक प्रयोगशाळा नागपुर येथे पत्र नि.क्र.६२ पाठविले होते. त्यांनी आरोपीचे व फिर्यादीचे रक्ताचे नमुने विश्लेशनसाठी काढुन मिळण्याकरीता वैद्यकीय अधिकारी यांना

पत्र दिले होते. त्यांना पत्र दि. २८.०८.२०१७ रोजीचे पत्र नि.क्र.६३ दाखविणयात आले. त्यानंतर आरोपीविरुद्ध न्यायालयात दोषारापपत्र दाखल केले. त्यांच्या तपासात असे निष्पन्न झाले होते की, आरोपीने गुन्हा केला होता. त्यांनी आरोपीने गुन्हयात वापरलेली काठी वस्तु क्र.अ व फिर्यादीचा फुल शर्ट वस्तु क्र.ब जप्त केले होते.

२०. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी अमान्य केले की, घटनास्थळ पंचनामा घटनास्थळी जावुन केले नाही. घटनास्थळ पंचनामा पोलिस स्टेशन येथे तयार करण्यात आला. वाहन चालकाला ते रस्ता सांगत होते व त्याप्रमाणे ते जात होते. निवेदन दिल्यानंतर दुपारी ३.१५ वाजता पंचनाम्याकीता निघाले व ४.४५ वाजता पंचनामा संपला होता. त्यांनी इतर सुचक प्रश्नांना त्यांनी नकारार्थी उत्तरे दिली.

२१. साक्षीदार सा.क्र.१० **सुरज राजरेडडी गददेवार** यांचे सरतपासात असे आले आहे की, दि. ०५.०९.२०१६ रोजी ते पोलीस स्टेशन, अहेरी येथे कार्यरत होतो. त्यांना सी.ए. मुद्देमाल कामी नागपुर येथे दाखल करण्याकरीता त्यांची डयुटी लागली होती. दि. ०६.०९.२०१६ रोजी मुद्देमाल नागपूर येथे घेऊन गेले व दि.०६.०९.२०१६ रोजी मुद्देमाल नागपूर येथे जमा केल्यानंतर पोचपावतीसह पोलीस स्टेशनला जमा केला. त्यांना बाहेरगांव ड्युटी पास नि.क्र.६६ दाखविण्यात आला. त्यांना पत्र नि.क्र.६१ दि.०२.०९.२०१६ दाखविण्यात आला. त्यांना मुददेमाल पोच पावती नि.क्र.६७ दाखविण्यात आली. पोलिसांनी त्यांचे बयान नोंदविले होते. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी मान्य केले की, फिर्यादी हे शिकलेला आहे. फिर्यादीने तोंडी तक्रार दिली होती व ती लिहुन घेतली. इतर सुचक प्रश्नांना त्यांनी नकारार्थी उत्तरे दिली.

२२. साक्षीदार सा.क्र.११ **भाग्यश्री महेंद्र कांबळे** यांचे सरतपासात असे आले आहे की,दि.२१.०८.२०१६ रोजी जक पोलीस स्टेशन, अहेरी येथे कार्यरत होती. त्या दिवशी स्टेशन डायरी अंमलदार म्हणुन ०८.०० ते १४.०० वाजेपर्यंत कार्यरत होते. त्या दिवशी पोलिस स्टेशन हजर असतांना फियादीची तक्राराप्रमाणे कम्प्युटर फिर्यादीची तक्रार लिहुन घेतली. त्यांना तोंडी फिर्याद नि.क्र.२१ दाखविण्यात आली. त्याप्रमाणे गुन्हा क्र. ६१/२०१६ कलम ३२६, ५०४ भादंवि कलमा अंतर्गत नोंद झाला होता. त्यांना प्रथम छापील खबर नि.क्र.७० दाखविण्यात आली.

आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी इतर सुचक प्रश्नांना त्यांनी नकारार्थी उत्तरे दिली.

२३. सहा.सरकारी अभियोक्ता आणि आरोपीतर्फे विधिज्ञ यांचा युक्तिवाद ऐकण्यात आला. तसेच प्रकरण व त्यामध्ये दाखल सर्व दस्ताऐवजांचे अवलोकन केले.

२४. अभिलेखावरील साक्षीदाराचे पुराव्याचे अवलोकन केले. अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी फक्त अकरा साक्षीदार तपासले. सा.क्र.१ फिर्यादी विठठल याच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्याने आपल्या पुराव्यात अभियोग पक्षाला समर्थन केले नव्हते. त्यामुळे सरकारी वकीलांनी फिर्यादीला फितुर घोषीत करून उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी दिल्यानंतर त्याची उलटतपासणी घेतली व उलट तपासणीमध्ये फिर्यादीने सर्व उत्तर सुचक प्रश्नांची होकारार्थी उत्तरे दिले. सा.क्र.२ मनोहर यांनी सुध्दा आपल्या पुराव्यात अभियोग पक्षाने समर्थन केले नव्हते. त्यामुळे सरकारी वकीलांनी फिर्यादीला फितुर घोषीत करून उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी दिल्यानंतर त्याची उलटतपासणी घेतली व उलट तपासणीमध्ये फिर्यादीने सर्व उत्तर सुचक प्रश्नांची होकारार्थी उत्तरे दिले. सा.क्र.३ भानुचंद हा फितुर साक्षीदार असल्यामुळे त्याच्या पुराव्याच्या चर्चा करून काही फायदा नाही. सा.क्र.५ अरूण आणि सा.क्र.६ सुनिल हे फिर्यादीचे मुले आहेत. त्यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, घटनेवेळी ते हजर नव्हते व ते घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असून ऐकीव साक्षीदार आहेत. सा.क्र.४ मनोज, सा.क्र.८ गिता, सा.क्र.९ चांगदेव, सा.क्र.१० सुरज आणि सा.क्र.११ भाग्येश्री हे सर्व पोलीस कर्मचारी आहे व सा.क्र.७ संजय हे वैद्यकिय अधिकारी आहेत. सा.क्र.४ व सा.क्र.८ ते ११ यांची साक्ष तांत्रीक पुराव्यावर अवलंबुन आहे.

२५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, फिर्यादी सा.क्र.३ याच्या पुराव्यात अभियोग पक्षाने त्याला जप्त शट तसेच आरोपीकडून जप्त केलेली काठी दाखविली नव्हती. सदर प्रकरणात अभियोग पक्षाने शर्ट आणि काठी फिर्यादीला दाखवुन त्याची ओळख फिर्यादीकडून करून घेतली नाही. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर प्रकरण परिस्थीतीजन्य पुराव्यावर अवलंबुन आहे. तसेच फिर्यादी सा.क्र.३, सा.क्र.५ अरूण व सा.क्र.६

सुनिल हे अभियोग पक्षाचे हितसंबंधीत साक्षीदार आहेत व अभियोग पक्षाने आरोपीचा गुन्हा सिध्द करण्याकरिता स्वतंत्र साक्षीदार तपासले नाहीत. सा.क्र.२ मनोहर आणि सा.क्र.३ भानुचंद हे अभियोग पक्षाचे स्वंतत्र साक्षीदार होते परंतु त्यांनी आपले पुरावे अभियोग पक्षाने सहकार्य केले नाही.

२६. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर घटनेचे फिर्यादीशिवाय कोणीही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाही व प्रकरण परिस्थीतीजनय पुराव्यावर अवलंबुन आहे. पुढे असे आहे की, अभियोग पक्षाने तपासलेले साक्षीदार क्र.५ व ६ हे हितसंबधीत साक्षीदार आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, फिर्यादी व आरोपीमध्ये जुन वाद आहे. कदाचित त्यामुळे त्यांच्यामध्ये वाद झाला असेल. परंतु घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार उपलब्ध नसल्याने हितसंबंधी साक्षीदारांचे पुराव्यावर विश्वास ठेवून आरोपीला दोषी ठेवणे न्यायोचित ठरणार नाही. सा.क्र.७ ते ११ यांची साक्ष तांत्रीक पुराव्यावर अवलंबुन आहे. परंतु जोपर्यंत इतर साक्षीदार अर्भियोग पक्षाच्या कथनाला समथ न करित नाही तोपयत आरोपीला दोषी धरून न्यायोचित नाही. पुढे असे आहे की, फिर्यादीला झालेली दुखापत आरोपीकडून जप्त करण्यात आलेल्या काठीमुळे झाली होती हे सिध्द करण्याकरिता फिर्यादीला काठी दाखविली नाही. एकंदरीत वर चर्चा केल्याप्रमाणे सर्व बाबींचा विचार करता आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यास अभियोगपक्ष अपयशी ठरला असे माझे मत आहे. परिणामतः पुराव्याअभावी, मी मुददा क्र.१ ते ४ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र.३ करिता :**

२७. उपरोक्त चर्चेनुसार मुद्दे क्र.१ चे कारणमिमांसेवरुन अभियोगपक्षाने आरोपीविरुध्दचा गुन्हा सबळ पुराव्याअभावी सिध्द केला नसल्याने, आरोपीला सदर खटल्यातुन निर्दोष मुक्त करणेचे निष्कर्षाप्रत मी आलो आहे. सदर प्रकरणात माननीय मुंबई उच्च न्यायालयाने **रंजना शांतीलाल सुर्यवंशी वि. जयप्रकाश तुळशीराम गुप्ता**[1] मध्ये दिलेल्या निर्देशाची अनुपालन करण्याची आवश्यकता आहे. म्हणुन, मुद्दा क्र.२ चे उत्तरार्थ मी खालील आदेश पारित करित आहे.

1 फौजदार अर्ज क्र.३८०/२०१९ मध्ये दि.१६.०७.२०२० चे आदेशाप्रमाणे

## <u>आदेश</u>

१. आरोपी **राजु नारायन कोंडागुर्ले,** याला फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये भा.दं.वि.चे कलम ३२६ व ५०४ नुसार दंडनिय अपराधातुन निर्दोष ठरवून मुक्त करण्यात येते.

२. आरोपीचे जुनी जामिनपत्र रद्द करुन जामिनदारास मुक्त करण्यांत येते.

३. आरोपीने फौ.प्र.सं. कलम ४३७–अ अंतर्गत वरिष्ठ न्यायालयात अपिल करिता हजर राहण्याकामी रूपये ४५,०००/– चा जामीन दाखल करावा.

४. जप्त मुददेमाल लाकडी काठी व शर्ट मुल्यहिन असल्यामुळे अपील कालावधीनंतर नष्ट करण्यात यावे.

५. माननीय मुंबई उच्च न्यायालयाने **रंजना शांतीलाल सुर्यवंशी वि. जयप्रकाश तुळशीराम गुप्ता**[2] या प्रकरणात दिलेल्या निर्णयातील मार्गदर्शक तत्त्वांना अनुसरुन, या न्यायनिर्णयाची एक सत्यप्रत मा. जिल्हा दंडाधिकारी, गडचिरोली यांच्याकडे पाठविण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर.)

Digitally signed by SAJIDUZZAMAN SHAHID
Date: 2026.04.29 15:56:14 +0530

दि.२९.०४.२०२६

(एस.एम.एच.शाहिद)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अहेरी

---

2 फौजदार अर्ज क्र.३८०/२०१९ मध्ये दि.१६.०७.२०२० चे आदेशाप्रमाणे